ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# येवल्याची सांस्कृतिक-साहित्यिक परंपरा

**प्रा. डॉ. भाऊसाहेब वि. गमे**
**प्र. प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला जि. नाशिक**
bvgame@rediffmail.com

***नाशिक जिल्ह्याला जशी सांस्कृतिक-साहित्यिक परंपरा आहे तशीच परंपरा येवला शहर व तालुक्याला आहे. राजकीय व सामाजिक चळवळीचे केंद्र म्हणून येवल्याकडे पाहिले जाते. तसेच सांस्कृतिक व साहित्याची परंपरा जोपासणारे केंद्र म्हणून येवल्याकडे पाहिले जाते. येवल्याची ही परंपरा जुनी म्हणजे १८८५ पासूनची आहे. आजही अनेक साहित्यिक या परंपरेत भर घालत आहे.***

साहित्य जीवनाचा आरसा असतो. त्यात व्यक्ती व समुहाचे जीवन वास्तवतेने उमटते. त्यामुळे ज्या शहरात मोठ्या प्रमाणात साहित्य लेखन होते. त्या शहरातील सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्न नकळतपणे आपोआपच जनतेसमोर येतात साहित्य हे जसे वास्तव असते तसेच ते कलात्मकही असते. येवल्याने ही परंपरा चांगली जोपासलेली आहे. असे म्हणतात की, माणसाचे जीवन त्रिकोणासारखे असते. त्रिकोणाचा पाया म्हणजे त्याच्या मुलभूत गरजा असतात. तर त्रिकोणाचा शिरोभाग माणूस कला व संस्कृतीकडे वळतो; परंतु मूलभूत गरजा पूर्ण झाल्यानंतरच माणूस कलेची निर्मिती करतो, असे पूर्णांशाने म्हणता येणार नाही. अनेक साहित्यिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नसतांनाही त्यांनी मात्र साहित्यनिर्मिती केलेली दिसते.

नाशिक जिल्ह्यात अनेक साहित्यिक होऊन गेले, अनेक साहित्यिक मोठ्या जोमाने साहित्य लेखन करीत आहेत. अशीच परंपरा येवला शहराने सुध्दा सांभाळलेली आहे. मनोहर शहाणे, बाळ भाटे, दशरथ सोनार, प्रा.श्रीरंग गुणे, गजानन भडकमकर, वि.वा.हडप, डॉ. अ.वा.वर्टी, ज्ञानेश सोनार, ल.रा.पांगरकर, शांताबाई दाणी, डॉ. म.बा.कुलकर्णी, प्रा.निशा पाटील, प्रा. डॉ. जयश्री पाटणकर, डॉ. रमेश वरखेडे, डॉ. दिलीप धोंडगे यांसारखे कितीतरी साहित्यिक, समीक्षक प्रज्ञावंत नाशिक जिल्ह्याच्या साहित्यिक परंपरेत योगदान देत आहेत.

**येवल्याची साहित्यिक परंपरा :**

येवल्यात पूर्वी राघव भूषण नावाचा शिळा प्रेस होता. या शिळा प्रेस मधून सत्यशोधक गणपतराव पाटील यांनी इ.स.१८८५ ते १८९२ या कालावधीत `तुकाराम` या नावाचे साप्ताहिक सुरु केले. यामुळे तत्कालीन येवलेकरांना पुरोगामी व परिवर्तनवादी विचारांचे व्यासपीठ लाभले.

इ.स. १८८७ मध्ये येवल्यात वैदिक धर्मप्रचारक आर्य समाजाची स्थापना झाली. इ.स. १८८८ मध्ये न्या. म. गो. रानडे यांचे `आर्य आणि अनार्य` या विषयावर विचार प्रवर्तक व्याख्यान झाले. हे व्याख्यान येवल्याच्या परिसरात वाङ्मयीन दृष्टीचे बीजारोपण करणारे ठरले. या काळात यदुनाथजी थत्ते शिक्षणासाठी येवल्यात होते. का.रं.वैशंपायन संस्कृतीचे अध्ययन करीत होते. आपटे गुरुजींचे राष्ट्रीय शाळेच्या माध्यमातून राष्ट्रीय, शैक्षणिक आणि त्याचबरोबर वाङ्मयीन कार्य सुरु होते. ते शाळेतून एक हस्तलिखित नियतकालिक काढीत असत. त्यास मौज पौर्णिमा अशी मुलांची पानं असत. त्यामुळे तत्कालीन पिढीचे वाङ्मयीन भरण पोषण झाले.

कै.काशिनाथ रघुनाथ वैशंपायन यांचा संस्कृत पंडित म्हणून असा मोठा लौकिक झाला होता. त्यांनी राष्ट्रीय भावनेतून लोकमान्य टिळकांचे १९३२ च्या सुमारास संस्कृत पद्यबध्द चरित्र लिहिले, त्यांनीच 'लोकमान्यांची भूपाळी

आणि इतर सहा कविता' ही मराठी पुस्तके लिहिली आहेत. 'जय जय टिळक सकल समर्था, धीराधी भास्करा' ही त्यांची भूपाळी राष्ट्रीय स्तरावर प्रार्थना म्हणून म्हटली जाई. ही पुस्तके स्वातंत्र्य सैनिकांत लोकप्रिय झालेली आहेत.

येवल्याचा साहित्यिक वारसा सांगणारे आणखी एक नाव म्हणजे मेघाप्रसाचार्य. वृंदावन गुरुकुलात वैदिक शास्त्राचे अध्ययन केलेले ते एक प्रख्यात पंडित होते. त्यांनी येवल्यातील वास्तव्यात १९३८ मध्ये 'दयानंद दिग्विजय' हे संस्कृत महाकाव्य लिहिले. या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी पत्नीचे दागिने मोडून पैसा त्यांनी उभा केला. आपटे गुरुजींनी 'साने गुरुजी' या नावाचे चरित्रात्मक पुस्तक लिहिले आहे.

**येवल्याची आधुनिक साहित्यिक परंपरा :**

येवलाच्या साहित्यिक चळवळीला स्वातंत्र्योत्तर कालखंडात गती मिळाली. महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार व प्रचार झाला. सामान्यातला सामान्य माणूस शिक्षणाकडे वळला. त्यामुळे स्व-आत्मभान निर्माण झाले. यशवंतराव चव्हाणांसारखे साहित्यिक व सांस्कृतिक दृष्टी असणारे मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभले. त्यामुळे मराठी भाषा व संस्कृतीबाबत एकूणच महाराष्ट्रात वातावरण निर्माण झाले. महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्था, म.गांधी विद्या मंदिर व तत्सम शैक्षणिक संस्था तळागाळातील माणसांसाठी शिक्षण देऊ लागल्या. त्यातून नाशिक जिल्हा व येवला तालुक्यातून मोठी साहित्यिक परंपरा उदयाला आली.

येवले शहरात १९७० मध्ये पहिले कला व वाणिज्य महाविद्यालय सुरु झाले. येथे अध्यापन करणारे प्राध्यापक साहित्यिक वारसा जोपासणारे होते. त्यातून अनेक विद्यार्थी घडले. प्रा. रणजीत परदेशी, प्रा.गो.तु.पाटील, प्रा.डॉ. भरतकुमार सिन्हा, प्रा.सुहास उपाध्ये, प्रा.दाते यांचे कार्य मोलाचे ठरले. १९८५ मध्ये येवल्यात पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाखा सुरु होती. अनेक महाराष्ट्रातील नामवंत वक्ते त्या निमित्ताने येवल्यात येवून गेले. त्याचा परिणाम येवलेकरांची साहित्यिक अभिरूची वाढली. म.सा.प.शाखेतर्फे छोटे-मोठे मेळावेही वेळोवेळी आयोजित केले जात होते. पुन्हा एकदा ही बंद पडलेली शाखा सुरु करण्याचा प्रयत्न येथील साहित्यिक करीत आहेत.

RESEARCH JOURNEY

**अनुष्टुभ या नियतकालीकाचे कार्य महत्त्वाचे :**

जुलै १९७७ मध्ये डॉ. रमेश वरखेडे व मनमाड महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य डॉ. म.सु.पाटील यांनी अनुष्टुभ या वाङ्मयीन नियतकालिकाची स्थापना केली. त्याचे केंद्र काहीकाळ मनमाड, धुळे होते; परंतु त्यानंतर जवळ-जवळ २०-२५ वर्ष या नियतकालिकांचे सर्व वाङ्मयीन व्यवहार प्रा.गो.तु.पाटील यांनी सांभाळले. त्यामुळे येवलेकरांना वेगवेगळ्या साहित्यिकांचा परिचय झाला. प्रा.गो.तु.पाटील यांच्यानंतर प्रा.डॉ.भाऊसाहेब गमे ही जबाबदारी सांभाळत आहेत. एखादे नियतकालिक इतक्या जबाबदारीने चालविणे ही खरोखरच कष्टप्रद गोष्ट आहे. आजही महाराष्ट्रातील अतिशय नामवंत कवी, लेखक, समीक्षक हे लेखन करीत आहेत. किंबहुना या लेखकांना त्यांचे नाव होण्याच्या अगोदर अनुष्टुभनेच प्रसिध्दी दिली हे विशेष!

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपटे गुरुजी कुटुंबियांचे पुण्यात स्थलांतर झाले. येथील वास्तव्यात गुरुजींच्या पत्नी राधाबाई आपटे यांनी आत्मचरित्र लेखनाच्या कसोट्यांवर उतरणारी 'उमटलेली पावले' व 'माझी वाटचाल' ही दोन आत्मचरित्रात्मक पुस्तके लिहिली. या पुस्तकांत कै.राधाबाई आपटे यांनी येवले शहर व तालुक्यात केलेल्या कार्याची आणि येवला तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळीचे संदर्भ आहे. बहुजन समाजातील माणसे ही आता लेखन करू लागली होती. त्यामुळे एका विशिष्ट वर्गाची साहित्यिक मक्तेदारी झुगारून लावण्याचे काम याही काळात झाले. येवल्यातून कै. हिरालाल शेंद्रे हिंदीतून व मराठीतून लेखन करीत होते. साप्ताहिक पत्र काहीकाळ त्यांनी प्रकाशित केले. याच काळात आज महाराष्ट्रातील प्रसिध्द व्यंगचित्रकार व जनता विद्यालयाचे पूर्व शिक्षक प्रभाकर झळके यांनी व्यंगचित्रांतून सामाजिक दर्शन घडविले. तसेच येवल्याचे नाव सातासमुद्रापार पोहोचविले. कै. सतीष कानडे यांच्या पत्नी शकुंतला

कानडे यांनी नाट्यकलेची जोपासना केली. पुढे याच कुटुंबातील क्रांती कानडे यांनी आपल्या अभिजात विचारांनी राष्ट्रीय पुरस्कारापर्यंत झेप घेतली व अव्याहतपणे कलेची निर्मिती त्या करीत आहेत.

पुढील काळात कै. ल. रा. कांबळे, कै. वामनराव खैरनार, येवल्याचे प्रसिध्द उद्योगपती कै. सत्यनारायण वर्मा, प्रसिध्द स्त्री रोग तज्ञ डॉ. एस. के.पाटील यांनी साहित्यिक चळवळीला मोठा पाठींबा दिला. त्यातून येवल्यात चांगली वाचक चळवळ निर्माण झाली. आज येवल्यात ही वाचक चळवळ मोठ्या जोमाने फोफावत आहे. ही आनंदायी व सांस्कृतिक समाधानाची बाब आहे.

**येवला महाविद्यालयाचे उन्मेष नियतकालिक :**

येवला महाविद्यालयाच्या उन्मेष नियतकालिकाने अनेक विद्यार्थ्यांमध्ये साहित्यिक प्रेरणा निर्माण केल्या. १९८२ मध्ये 'येवला तालुका स्त्री विशेषांक' निघाला. स्त्रियांचे दु:ख, वेदना शब्दांमधून समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम झाले. त्यानंतर 'येवला तालुका दुष्काळ विशेषांक', 'येवला तालुका शेती विशेषांक' प्रसिध्द झाला. या नियतकालिकास यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा पुरस्कार मिळाला. प्रसिध्द स्वातंत्र्य सेनानी गोविंदभाई श्रॉफ यांनी या नियतकालिकाचे माजी मंत्री प्रशांतदादा हिरे यांचे उपस्थितीत नियोजन केले. सर्व विशेषांक व इतरही विषयांवरील लेखन येवल्याच्या प्राध्यापकांनी करून घेतले. प्राध्यापक रणजीत परदेशी, प्रा. गो.तु.पाटील, प्रा.भरतकुमार सिन्हा, प्रा.डॉ. भाऊसाहेब गमे यानी उत्तम संपादन केले व अनेक विद्यार्थ्यांना लेखनासाठी व्यासपीठ निर्माण केले. आजही ही परंपरा सुरु आहे. येवल्यातील अनेक साहित्यिक व पत्रकार या व्यासपीठावरून घडले.

येवल्यातील राठी प्रतिष्ठान या संस्थेनेही येवल्याला अनेक सांस्कृतिक क्षेत्रातील माणसे उपलब्ध करून दिली. साहित्यिक मेळावे, नाट्यप्रयोग यामुळे यामुळे साहित्यिक परंपरेला बळ मिळाले आहे. लेखकांची ही नवी फळी लेखन करीत आहे. ललीत लेखनाबरोबरच येवल्यातून वैचारिक लेखनही मोठ्या प्रमाणात पत्रकारितेच्या रूपाने लिहिले जाऊ लागले आहे. कै. विनायक लोंढे, रमेश नागपुरे यांनी कथा, कविता व स्फुट लेखन प्रसिध्द केलेले आहेत.

येवल्याचे वैशिष्ट्य म्हणजे येवल्यातील अनेक पत्रकार साहित्य व संस्कृतीची जाण असणारे आहे. त्यामुळे त्यांचे लेखन समाजाला दिशा देण्यासाठी, समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. ज्येष्ठ पत्रकार रमेशचंद्र पटेल, कै. नंदलाल कायस्थ, योगेंद्र वाघ, चंद्रकांत झांबरे यांनी उत्तम लेखन केले, करीत आहेत. त्याचबरोबर नव्या काळातील पत्रकार प्रा. संतोष विंचू, सुनील गायकवाड, राकेश गिरासे, विलास पगारे, प्रकाश साबरे, रवींद्र करमासे, प्रा. दत्ता महाले, अविनाश पाटील, लक्ष्मण बाराहाते, प्रमोद पाटील, प्रा. शिवाजी भालेराव, कुमार गुजराथी यांनी लेखनातून वैचारिक चळवळ निर्माण केली आहे. तर संगणक अभियंता असलेले भागवतराव सोनवणे यांनी अमेरिकेतील टेक्सास शहरात राहूनही 'खोल खोल पाणी', 'टाहो' या वृत्त मालिका आपल्या अभ्यासू वृत्तीने जनतेसमोर मांडल्या, तालुक्यातील पाणी प्रश्नावरील त्यांचा अभ्यास व पाणी समस्या सोडविण्यासाठीची तळमळ, त्यावरील उपाय मांडण्याची लकब वाखानण्याजोगी आहे.

रेश्मा कंदलकर यांनी सा.फु.पुणे विद्यापीठाचे सुवर्णपदक मिळवून पत्रकारितेमध्ये शिक्षण घेतले व युवतींसाठी मोठा आदर्श निर्माण केला. चंद्रमणी आकाशवाणीवरून समाजोपयोगी काम करीत आहेत. तर नानासाहेब पटाईत समाजवादी विचारांनी लेखन करीत आहेत. मराठीबरोबरच साहित्य अकादमीप्राप्त प्रसिध्द कवी खलिल मोमीन हे येवल्याचेच, तसेच उर्दू शायर कादरी नऊल्लाह, नूर हजरत सुल्तान, नक्षुंदी, जमील शफाक, कादीर एवलवी, प्रा. दस्तगीर, डॉ. अनामत यांची नावे या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

आज समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन कोकाटे हे कवी म्हणून आहेत. तसेच अनेक दिवाळी अंकाचे संपादन ते करत असतात, 'मराठा जात : कार्य व कतृत्व', 'भुमिपूत्र' व तत्सम अंकातून वाङ्मयीन सेवा ते करीत आहेत. विशेष

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

म्हणून राष्ट्रसेवादल, समाजवादी अध्यापक संघ या संस्थांच्या विचारातून लेखन करीत आहेत. वैचारिक लेखन हा त्यांचा पिंड आहे. विक्रम गायकवाड यांचा नुकताच "जगणे शोधित होतो", कवी प्रा. बाळासाहेब हिरे यांचा 'झाकोळला नभी सूर्य', कवी बाळासाहेब सोमासे यांचा 'रान उदास उदास', कवी लक्ष्मण बाराहाते यांचा 'पाच बिघे' हे कवितासंग्रह उत्तम वाङ्मयीन निर्मिती म्हणून ओळखले जातात. कवी बाराहाते यांच्या कवितासंग्रहाला उत्तम साहित्य लेखनाचे अनेक पुरस्कारही लाभलेले आहेत. विशेष म्हणजे अनेक वर्तमानपत्रे व नियतकालिकातून या कवींच्या कविता प्रसिध्द झाल्या आहेत, होत आहेत. कै. पंडित गवळी यांचा 'आवस', लेखक पी.जी.वानखेडे यांचा 'दगडफुल' हे कथासंग्रह वाचकांच्या पसंतीला उतरले आहेत. प्रा. गो.तु. पाटील यांचा 'नटसम्राट समीक्षा' हा ग्रंथ नटसम्राटच्या अभ्यसकांना उपयोगी पडला. अलीकडेच त्यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी चरित्रमाला या मालिकेत संत व राष्ट्रीय व्यक्तींच्या सोळा चरित्रपर पुस्तकांचे लेखन केले आहे. 'महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी' हा कै. मोहनराव गुंजाळांवरील प्रा.गो.तु.पाटील व प्रा. रणजित परदेशी यांनी संपादित केलेला ग्रंथ मौलिक संदर्भ म्हणून ओळखला जातो.

प्रा. रणजित परदेशी यांचे सत्यशोधक मार्क्सवादी चळवळीत मोलाचे स्थान आहे. 'सत्यशोधक मार्क्सवादी' या नियतकालिकाच्या 'सौंदर्यशास्त्र विशेषांका'ला आजही तेवढेच मूल्य आहे. प्रा. परदेशी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मार्क्स, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा परिचय करून देणाऱ्या अनेक पुस्तिका विशेष गाजल्या आहेत. येवल्याचे प्रसिध्द इतिहासाचे अभ्यासक नारायण क्षीरसागर यांनी येवले तालुका व परिसराचा इतिहास पुस्तकरूपाने संपादित करून फार मोठा दस्तऐवज तयार करून ठेवला आहे. येवल्याच्या स्मृती त्यामुळे जिवंत झाल्या आहेत. आताही या वयात ते पीएच्.डी. साठी संशोधन करीत आहेत. ही येवलेकरांच्या दृष्टीने गौरवाची बाब आहे. याबरोबरच संतू पा.झांबरे., कै. मोहनराव गुंजाळ यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर खूप मोठे लेखन केले आहे. बापूसाहेब पगारे, प्रा. प्रभाकर झळके, संस्कृतीचे प्रसिध्द अभ्यास डॉ. प्रसादशास्त्री कुलकर्णी, गोविंदशास्त्री मोहनी, ॲड रमेश खैरनार हे वेळोवेळी वेगवेगळ्या विषयांवर लेखन करीत आहेत.

भास्कर कोल्हे, प्रा. डॉ.उषा सोरते, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, सूवर्णा चव्हाण, सुधाताई कोकाटे, शरद आहेर, सुवर्णा चव्हाण, किशोर जाधव, भगवान चित्ते, ॲड. दिलीप कुलकर्णी, अंजली गुजराथी, ॲड. भायभंग, प्रा. मनोरमा कासलीवाल, शैला कलंत्री, न्या.विनायक लोंढे, रमेश नागपुरे, याचे लेखनही खूप महत्त्वाचे आहे. येवल्यात अनेक व्यावसायिक व इतर महाविद्यालये सुरु झालेली आहेत. त्यामुळे अनेक स्पर्धांच्या निमित्ताने अनेक येवल्यातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात लेखन करीत आहेत. ही लेखनाची परंपरा येवला शहराच्या वैभवात भर घालते आहे.

------***------